कॅम्प गोरेगाव

दिनांक :— २०.०९.२०१९

**प्रेसनोट**

**लोकसेवक अमोल दामोधर शिंदे, वय ३२ वर्ष, व्यवसाय नौकरी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत गुगुळ पिंपरी, अति. कारभार शिनगी नागा, पंचायत समिती, सेनगाव. ता. सेनगाव जि. हिंगोली, वर्ग —३, यांना लाचेची रक्कम स्विकारल्यावरून ताब्यात घेतले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक १८.०९.२०१९ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे भावाचे नावे असलेल्या मालमत्ता—१४० मधील जागा, वाटणीपत्राव्दारे तक्रारदाराचे नावे करून देवुन, तसा फेर घेवुन, नमुना नंबर ०८ देणेसाठी, ग्रामपंचायत, गुगुळ पिंपरी येथील ग्रामसेवक अमोल शिंदे हे तक्रारदार यांचेकडे १,५००/— रूपयांची लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक १८.०९.२०१९ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक अमोल शिंदे, ग्रामसेवक, यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून लाचेची रक्कम १,५००/— रूपये स्विकारण्यास सहमती दिली होती. त्यावरून दिनांक २०.०९.२०१९ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक अमोल शिंदे, ग्रामसेवक यांनी ती लाचेची रक्कम १,५००/— रूपये ग्रामपंचायत कार्यालय, गुगुळ पिंपरी, ता. सेनगाव जि. हिंगोली येथे स्विकारली. त्यावरून लोकसेवक अमोल शिंदे, ग्रामसेवक यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती ममता अफुने, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोहेकॉ श्री आढाव, पोना श्री महारूद्रा कबाडे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री तानाजी मुंडे, पोशि श्री प्रमोद थोरात, पोशि श्री अविनाश किर्तनकार, चापोना श्री सरनाईक अ‍ॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अ‍ॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.— १०६४,** दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५,

**मोबाईल क्रमांक :—** ८८८८७१७९९९, ९९२३०४२५६५, ८१७७८१८८२५.

Scanned by CamScanner